**उप वनसंरक्षक, रोहा वनविभाग - रोहा यांचे कार्यालय,**
कार्यालय दुरध्वनी क्रमांक : ०२१९४ / २३५७५५. email - dcfroha@gmail.com

विषयः- **वनजमीन रायगड**
नागलोली साठवण तलाव, ता. श्रीवर्धन,
रायगड वन प्रस्ताव सादर करणे बाबत.
क्षेत्र ६.५.० हे.

जावक क्रमांक ब/२०/जमीन/ ३६९८ /२०१४-१५.
रोहा ४०२ १०९, दिनांकः- २६ /११/२०१४.

प्रति,
कार्यकारी अभियंता,
लघुसिंचन (जलसंधारण)विभाग,
कळवा, ठाणे.

संदर्भः- १) कार्यकारी अभियंता,लघुसिंचन (जलसंधारण)विभाग,कळवा, ठाणे पत्र क्र. ल.सि.(जसं)वि/प्रशा-२/२३९२ दिनांक १९/९/२०१४ (प्राप्त दिनांक २२/९/२०१४).
२) या कार्यालयाचे पत्र क्र./ब/२०/जमीन/२९७० दि.२५/९/२०१४
३) कार्यकारी अभियंता,लघुसिंचन (जलसंधारण)विभाग,कळवा, ठाणे. यांचे कडील दिनांक ७/११/२०१४ चे दुरध्वनी संदेश.

आपण संदर्भीय पत्रान्वये नागलोली साठवण तलाव योजने अंतर्गत समाविष्ठ होणारे वनक्षेत्र ६.५ हेक्टर चा वनजमीन मागणीप्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. प्रस्तावातील नकाशा व तदअनुषंगी कागद पत्राची तपासणी केली असता त्यामध्ये खालील प्रमाणे त्रृटी दिसून येत आहेत.

१. प्रस्तावात केंद्रशासनाचे निर्देशानुसार चेकलिस्ट सादर केलेली नाही तरी परिपूर्ण व बिनचुक चेकलिस्ट सादर करावी. व चेकलिस्ट मध्ये नमूद केलेल्या सर्व बाबीची पुर्तता करावी.
२. प्रकरणी वनक्षेत्र व वनेत्तर क्षेत्राचे ७/१२ उतारे आंग्लभाषेत सादर केलेले नाहीत.
३. ग्रामसभेच्या ठरावाची व प्रोसिडींग ची प्रत आंग्लभाषेत जोडलेली नाही.
४. Form A (Part-I) खाडाखोड केलेली असून तो परिपूर्ण भरलेला नाही.
५. महाराष्ट्र खाजगी वन संपादन अधिनिमय १९७५ अंतर्गत कलम २२ अंतर्गत खातेदारास पुन:स्थापित झालेल्या क्षेत्राचे आदेश जोडलेले नाहीत.
६. सदर प्रस्तावात Form-A Part-I मध्ये ज्या सर्वे नं. व गट नं. चा उल्लेख केला आहे पैकी खालीलप्रमाणे गट नं. सर्वे नं चे गट स्किम उतारे प्रस्तावात जोडलेले नाही. गट नं.१४५, १४४, १४३, १४२, १०४, १०५, १०९, १४१, ११७.
७. सदर प्रस्तावात Form-A Part-I मध्ये ज्या सर्वे नं. व गट नं. चा उल्लेख केला आहे पैकी खालीलप्रमाणे गट नं. सर्वे नं चे ७/१२ उतारे प्रस्तावात जोडलेले नाही. गट नं.१४५, १४४, १४३, १४२, १०४, १०५, १०९, १४१, ११७.
८. गट क्र.११५ चे ७/१२ वर फॉरेस्ट लिहले आहे मुळात त्या ७/१२ वर भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ३५ सेक्शन आहे.
९. गट नं.१३६ चे ७/१२ वर राखीव वन आहे. मुळात त्या ७/१२ वर भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ३५ नुसार खातेदारास पुन:स्थापित केलेले आहे.
१०. सदर प्रस्तावामध्ये तांत्रिक मंजूरीचे आदेश जोडले आहेत ते आंग्लभाषेत नाही.
११. सदर प्रस्तावमध्ये प्रकल्प यंत्रणेने भाग एक मधील Part-I परिपुर्ण भरलेला नाही.(अनु क्र.३ ते ६ जोडलेले नाही.)
१२. वनसदृश वनेची यादी जोडलेली नाही.
१३. अनुक्रमाणीका परिपुर्ण भरलेली नाही.

१४. जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांचेकडील आदेश आंग्लभाषेत नाहीत.

१५.प्रमाणपत्र ९ व १० वरती उप वनसंरक्षक उस्मानाबाद यांचे पुर्ण नाव नमूद केलेले नाही.

१६. पर्यायी वनीकरणासाठी जो ७/१२ उतारा जोडला आहे तो आंग्लभाषेत सादर केलेला नाही.

१७. सदर प्रस्तावामध्ये प्रकल्प यंत्रणेने जे विविध प्रमाणपत्र सादर केलेल त्यामध्ये परिपूर्ण गट नं व सर्वे नं.चा उल्लेख केलेला नाही.

१८. Net Present value च्या Certificate मध्ये खाडाखोड केलेली आहे.

१९.Additional Information Certificate मध्ये काही भाग टंकलिखित न करता हस्ताक्षराने लिहलेला आहे.

२०.सर्व प्रमाणपत्रावरती कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी ही छायांकित केली आहे.

२१.काहि प्रमाणपत्रामध्ये गाळलेल्या जागा सोडलेल्या आहेत.

२२.सदर प्रस्तावामध्ये जेवढी कागदपत्रे ही मराठी भाषेत सादर केलेली आहे ती आंग्लभाषेत सादर करावी.

सोबत:- वरील प्रमाणे

उप वनसंरक्षक,
रोहा वनविभाग, रोहा.